ज्ञानदीप मिटवी अज्ञान

# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## Maharashtra Prathamik Shikshan Parishad

(Govt. of Maharashtra Undertaking)

जा. क्र. मप्राशिप/सशिअ/निवासी वसतिगृह/२०१७-१८/ १३७४ दिनांक 16 JUN 2017

**विषय: सन २०१७-१८ मध्ये निवासी वसतिगृहाच्या अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ : परिपत्रक क्र. मप्राशिप/सशिअ/निवासी वसतिगृह/२०१६-१७/१६११, दि. ०४/०७/२०१६.**

१) निवासी वसतिगृह ही योजना विशेष घटकातील मुलांसाठी असून त्यामध्ये योग्य लाभार्थींना प्रवेश देऊन नजिकच्या नियमित शाळेत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

२) मुलांच्या वसतिगृहातील उपस्थितीसाठी यु-आयडी आधार अनिवार्य राहील. त्यासाठी बायोमॅट्रिक / Facial Recognition यासारख्या प्रणालीचा वापर करण्यात यावा. या प्रणालीतील माहितीशिवाय विद्यार्थ्यांना दिले जाणारे लाभ ग्राह्य धरले जाणार नाही.

२) सन २०१६-१७ प्रमाणेच सन २०१७-१८ मध्ये भारत सरकारने दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीत ७ निवासी वसतिगृह राज्यातील तीन जिल्हा परिषदा (बुलढाणा, गोंदिया व नांदेड) व चार महानगरपालिकांसाठी (नागपूर, नाशिक, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली) मंजूर केले आहेत.

३) जिल्हा परिषद व महानगरपालिकांसाठी मंजूर भौतिक लक्ष्य व आर्थिक तरतूद वित्तीय अंदाजपत्रकामध्ये नमूद केली आहे. भौतिक व आर्थिक तरतुदीचे निकष वित्तीय नियमावलीच्या मर्यादेत लागू राहतील.

४) दर तीन वर्षांनी मुलांसाठी नवीन Bedding घेण्याकरिता आर्थिक तरतूद मंजूर होते. सन २०१७-१८ मध्ये याकामी तरतूद मंजूर झाली असून वित्तीय नियमावलीतील निकषांच्या अधिन राहून सदर Bedding ची खरेदी या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये करण्यात यावी.

५) या योजनेसाठी मंजूर अनुदान संबंधित निवासी वसतिगृहाच्या खात्यावर दिनांक १५ जुलै, २०१७ अखेरपर्यंत वर्ग करण्यात यावे.

६) सर्व खर्च नियमानुसार करण्यात यावा. केलेल्या खर्चाचे व प्रक्रियेचे अभिलेखे जतन करुन ठेवावे व आवश्यकतेनुसार तपासणी / लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दयावे.

७) निवासी वसतिगृहात शिकणाऱ्या मुलांची संपादणूक पातळी मागील वर्षापेक्षा अधिक असणे गरजेचे आहे.

८) राज्यात सध्या डिजीटल शाळा, तंत्रस्नेही शिक्षक, प्रगत शाळा, स्पोकन इंग्लिश, शाळा सिद्धी, समाज सहभाग, वाचन प्रेरणा दिवस यासारख्या चळवळी (Movements) सुरू आहेत. यातून साध्य होणाऱ्या परिणामांचा लाभ या निवासी वसतिगृहातील मुलांनाही प्राप्त झाला पाहिजे. त्यादृष्टीने योग्य नियोजन करून यामधील तरतूद त्याकामी विनियोगात आणता येईल.



Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

९)	महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांचेकडून भाषा व गणित या विषयातील संकल्पना समृद्धीकरणासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये शैक्षणिक साहित्याच्या प्रभावी वापरातून प्रत्येक मूल निर्धारित संपादणूक पातळी गाठू शकेल याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचाही या निवासी वसतिगृहातील शिक्षक व मुलांना लाभ मिळेल याची खात्री करावी.

१०)	या निवासी वसतिगृहामधील शैक्षणिक बाबींशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

प्रति,
१)	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा, गोंदिया, नांदेड.
२)	आयुक्त, महानगरपालिका, नाशिक, नागपूर, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर.

प्रत : माहितीस्तव,
१)	मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२)	मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,
१)	आयुक्त (शिक्षण), आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२)	शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३)	संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
४)	विभागीय शिक्षण उपसंचालक, विभाग-नागपूर, अमरावती, लातूर, नाशिक, मुंबई.
५)	प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, बुलढाणा, गोंदिया, नांदेड, नाशिक, नागपूर, ठाणे.
६)	शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बुलढाणा, गोंदिया, नांदेड.
७)	शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, नाशिक, नागपूर, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर.